**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ११९** **दिनांक : १२/०२/२०२५**
**विभाग : बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) सन २०२४-२५ (दलितेत्तर वस्ती सुधार योजना मनपा अनुज्ञेय रकमेव्यतिरिक्त किंवा नाविण्यपुर्ण योजना ) अहिल्यानगर शहरात केडगांव अमरधाम व स्टेशन अमरधाम व इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार महानगरपालिका क्षेत्रात इको फेंडली अंत्यसंस्कार योजना (crematorium )(Pollution free modern Wood based Traditional Cremation System) बसविणेबाबत ...

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर मनपाची स्थापना ३० जून २००३ रोजी झालेली असून नगरपरिषद काळात केडगांव,बोल्हेगांव,नागापूर,फकीरवाडा,बुरूडगांव इत्यादी गावांचा नव्याने १ जुलै १९९९ रोजी झालेला आहे. सध्या अहिल्यानगर शहर हे विकासनशिल शहर म्हणून उदयास येत आहे.सध्या शहराची लोकसंख्या अंदाजे ५ लाखाच्या पुढे आहे. सद्यस्थितीत स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी लाकडांचा वापर मोठया प्रमाणात होतो. लाकडांचा मोठया प्रमाणात होणारा वापर हा पर्यावरणाच्या दृष्टीने हानीकारक आहे. त्यामुळे शहरात इको फ्रेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा बसविणे गरजेचे आहे. अहिल्यानगर शहरात केडगांव अमरधाम व स्टेशन अमरधाम व इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार इको फ्रेंडली अंत्यसंस्कार योजना (Crematorium) (Pollution free modern Wood based Traditional Cremation System) बसविणेबाबत सध्या मनपाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) सन २०२४-२५ अंतर्गत निधी उपलब्ध करून देणेस विनंती रिपोर्ट मान्यतेस सादर.

तसेच छत्रपती संभाजीनगर येथील मुकुंदवाडी व प्रतापनगर येथील इको फ्रेंडली अंत्यसंस्कार योजनेअंतर्गतचा Feed back देखील सोबत जोडत आहे व पारंपारिक पध्दतीने दहन प्रक्रिया व इकोफेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा या दोन्ही प्रकारातील तफावत पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | पारंपारीक पध्दतीने दहन प्रक्रिया | इको फेंडली अंत्यसंस्कार यंत्रणा |
|---|---|---|
| १ | साधारण ४ ते ५ क्विंटल इतक्या लाकडाची आवश्यकता असते | ९० ते १०० किलो इतकी आवश्यकता असते. त्यामुळे साधारण ४०० किलो लाकडाची बचत होणार आहे. |
| २ | कार्बनडाय ऑक्साईड (co२) १००% पर्यात तयार होवून शरीरास हानीकारक आहे. | इको फेंडली प्रक्रियेमध्ये कार्बन डाय ऑक्साईड (co२) ९०% पर्यत कमी होणार असून त्यामुळे दमा,थायरॉर्डड इत्यादी कमी होणार आहे. |
| ३ | काळा धुर होत असल्याने तो त्रासदायक /हानीकारक आहे. | पांढरा धुर तयार होवून हानीकारक नाही. |
| ४ | या दहन क्रियेमध्ये साधारण ४ ते ५ तास इतका कालावधी लागतो. | या दहन प्रक्रियेमध्ये साधारण १ ते १.४५ तास इतका कालावधी लागतो. त्यामुळे पर्यायाने |

| | | |
|---|---|---|
| | | वेळेचे बचत होणार आहे. |



| | | |
|---|---|---|
| ५ | यामध्ये साधारण एक शव दहनासाठी रू.५००००/- इतका खर्च येतो. | यामध्ये साधारण एक शव दहनासाठी रू.८००/- ते रू.१०००/- इतका खर्च येतो.पर्यायाने खर्चाची बचत होणार आहे. |
| ६ | शव दहनासाठी किमान तंत्रज्ञान चालते | यासाठी किमान एका महिन्यासाठी प्रशिक्षकाची आवश्यकता लागणार आहे. |
| ७ | अस्थिसाठी दुस-या दिवशी यावे लागते. | यामध्ये दोन तासामध्ये अस्थि मिळणार आहे. |

त्याअनुषंगाने प्रस्तृत कामाचा विहीत नमुन्यातील प्रस्ताव, कामाचे तांत्रिक मान्यतेसह सविस्तर अंदाजपत्रक,अनुषंगिक प्रमाणपत्रे तसेच कामाची गरज,कामाची उपयुक्तता व व्यवहार्यता याबाबत नगररचना विभागाचे अभिप्रायासह परिपुर्ण प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी ,अहिल्यानगर यांना सादर करणेबाबत आदेश होणेस रिपोर्ट मान्यतेस सादर. त्यानुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहून कार्यवाही करणे उचित वाटते.

१.सदर प्रकल्पाअंतर्गतची प्रस्तावित कामे ही मनपाच्या मालकीच्या ठिकाणीच करण्यात येतील. कामाचे स्वरूप सार्वजनिक राहील. तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरीकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे. याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरूप नसल्याची खातरजमा करणे.

२.सदर प्रकल्पांअंतर्गत ई - निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अदयावत मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३.सदर प्रकल्पांअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याचे उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर निधी खर्च झाला किंवा कसे हे पाहणे.

४.निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सुचनांचे व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत भंग होणान नाही तसेच कुठलाही शासन नियम /अधिकाराचा भंग होणार नाही हे पहाणे.

५.सदर प्रकल्पांअतर्गत दुरूस्तीची तथा परिक्षणाची कामे हाती घेण्यात येणार नाहीत.

६.सदर प्रकल्पांअंतर्गत कामांचे सुरू करण्यापूर्वीचे स्थितीचे व काम पुर्ण झाल्यानंतरच्या कामाचे चित्र काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.कामची पुनआवृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

७.सदर प्रकल्पाअंतर्गत कामाचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेण कार्यान्वयीन यंत्रणेस (अहिल्यानगर महानगरपालिकेस ) बंधनकारक राहील.

८.सदर कामांसाठी इतर योजनेअंतर्गत सहाय्य घेतलेले नाही.

९.सदर कामाकरिता कोणत्याही बॅकेकडून कर्ज घेतलेले नाही.

१०.सदर काम यापूर्वी इतर कोणत्याही निधीतून मागील १० वर्षाचे कालावधीत झालेले नाही व प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत.

११.सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची परवानगी घेण्याची जबाबदारी ही संबंधीत ठेकेदार यांची राहील.

१२.सदर प्रकल्पासाठी एकुण चार ठिकाणे प्रस्तावित असून त्यासाठी अंदाजित रू.५.०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्याची देखभाल दुरूस्ती एका वर्षासाठी संबंधीत ठेकेदार याची राहील.

त्यापैकी प्रस्तावित संकल्पात ही मृतदेह जाळण्याचे प्रक्रियेबद्दल असून सदर अंत्यविधी ज्या धार्मियांमध्ये केला जातो प्रथमतः त्यांना याची कल्पना जाहिरात वापरणेसाठी पुरस्कृत करणे आवश्यक आहे.

सदर Eco-Friendly या नात्याने नालेगांव अमरधाम येथे विद्युतदाहिनी मोठी रक्कम खाजगी विकासकाने खर्च करून उभारलेली आहे. परंतु एकुण अंत्यविधीच्या १० टक्के पेक्षा कमी प्रमाणात त्याचा वापर होत आहे. याचे

मुख्य कारण पारंपारिक अंत्यविधीला कोणीही फाटा देत नाही. त्याचधर्तीवर लाकडाऐवजी Eco-Friendly पध्दतीने करणेबाबतची चर्चा मा.जिल्हाधीकारी,अहिल्यानगर यांचेकडे झाली असून त्याबाबतचा दुरध्वनी संपर्क



अहिल्यानगर मनपाने केला व प्रस्ताव सादर करणेबाबतचे सूचना दिलेल्या आहेत. तसे पत्र मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचे संदर्भिय पत्र प्राप्त आहे. त्यामध्ये संबंधित एजंन्सीने खालीलप्रमाणे वैशिष्टे सांगितलेल आहे. की त्याबाबत इकडील विभाग अज्ञात आहे.

१.गॅस कमी होवून पर्यावरणाचा -हास कमी होणार आहे.

२.कमी लाकडमध्ये होवून खर्चामध्ये होणार आहे.

३.वेळेचे बचत होणार आहे.

४.मटेरिअलचे वेस्टेज कमी होणार आहे.

तथापी सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक करणे कामी स्थापत्यीक त्याचबरोबर काही दर बाजारभावाप्रमाणे करावयाचे आहेत. त्याकरीता बाजारभावाचे दर,स्पेसिफीकेशन,सविस्तर नकाशे इत्यादी अंतर्भुत करून प्रथमतः दर निश्चित करून ते अंदाजपत्रकात समाविष्ठ करणे आवश्यक आहे. सदर कामी बाजारातून तीन दरपत्रके प्राप्त झाली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पुरवठादाराचे नांव | प्राप्त दरपत्रक सिव्हील कामानुसार (in Lakh) | प्राप्त दरपत्रक डि एस आर व्यतिरीक्त | एकुण प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| १ | **Skylit Consultancy,Sector to Kharghar,Navi Mumbai,Maharashtra** | 56.00+GST | 367.00+GST | रू.423 .00+GST |
| २ | **M/s Incubate Consultancy Services,Sita Estate,Chember,Mumbai** | 63.00+GST | 384.00 +GST | रू.447 .00+GST |
| ३ | **Omex Control System,Karveernagar,Dahisar,Mumbaia** | 71.28+GST | 363.00+ GST | रू.434 .28+GST |

तसेच सदर प्रकारचा प्रकल्प हा वापरण्यात आलेल्या ठिकाणाचा व त्याव्यतिरिक्त मिळणारा प्रतिसाद याची माहिती नाही परंतु एकत्रित ४ ठिकाणी सुमारे रूपये ५.०० कोटी रक्कम मागणी करावी लागणार आहे.व त्यास भविष्यात प्रतिसाद न मिळाल्यास रक्कम वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण मनपा हद्दीत Eco-Friendly विदयुत दाहिनीला तितकासा प्रतिसाद नाही. त्यामुळे दहन पध्दतीने मनपा अखत्यारीत केडगांव अमरधाम, स्टेशन अमरधाम, नालेगांव अमरधाम,प्रस्तावित सावेडी अमरधाम इत्यादी उपलब्ध आहेत. त्यापैकी कोणत्या ठिकाणी जागा निश्चित करणेस मा.महासभेची मंजूरी देणत येत आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतुन प्रस्तावित महानगरपालिकेस नियमित मिळणा-या निधी व्यतिरीक्त नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजना महानगरपालिकेस अनुज्ञेय रकमे व्यतीरीक्त किंवा नाविण्यपुर्ण योजनेतून प्रस्तावित करणेस तसेच सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडेस मंजूरीस पाठविणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. १२०** **दिनांक : १२/०२/२०२५**
**विभाग : पाणी पुरवठा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना सन २०२४-२०२५ शहर पाणी पुरवठा योजनेच्या विळद पंपींग स्टेशन ते वसंतटेकडी दरम्यान कार्यरत जलवाहिन्यां विळद घाट येथील ठिकाणी स्थलांतरीत करणे कामी प्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेस व विकास कामास मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांची प्रशासकीय मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मा.सहा.आयुक्त (नपत्र) जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर यांचे मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील,मंत्री,जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ तथा पालकमंत्री अहिल्यानगर ) यांचे पत्र इकडेस प्राप्त झाले असून नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना सन २०२४-२५ या लेखाशिर्षाअंतर्गत विषयांकित कामाचा विहीत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे बाबत सुचित केलेले आहे.

या अनुषंगाने सादर की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत विळद घाट परिसरात ८१३ एम.एम.व १०१६ एम.एम.व्यासाची एम.एस. या दोन मुख्य जलवाहिन्या सन १९९३-९४ पासून कार्यरत आहेत. सदरच्या जलवाहिन्यांव्दारे शहरासाठी पाणी पुरवठा केला जात आहे. महामार्गाच्या वेळोवेळी झालेल्या रूंदीकरणामुळे सदरच्या जलवाहिनीवर मोठया प्रमाणात भर पडलेली आहे. तसेच जलवाहिनी जुनी असल्या कारणाने सतत दुरूस्तीची कामे करावी लागत आहे. त्यामुळे शहराच्या पाणी वितरणातही अडथळे निर्माण होत आहे. तसेच सदरच्या जलवाहिनीवर मोठया प्रमाणात भर पडलेली असल्याने देखभाल व दुरूस्तीस निर्माण होत आहेत.

सदर विषयाचे अनुषंगाने वरील बाबी व निर्माण होणा-या अडचणी विचारात घेता या दोन जलवाहिन्या अंदाजे ३०० मीटर अंतराच्या स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार म.जी.प्रा. यांचे जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार केले असता या कामी रक्कम रू.३,०५,६८,२६९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

विषयांकित कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे करिता मा.जिल्हाधीकारी महोदय,यांना विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरून मा.सह आयुक्त (नपप्र) जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र प्राप्त झाले असून जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२०२५ नागरी दलितेतर वस्ती सुधारणा (२२१७३३२) या लेखाशिर्षा अंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी विहीत प्रस्ताव कार्यालयाकडे सादर करणे विषयी सुचित केले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | शहर पाणी पुरवठा योजनेच्या विळद पंपींग स्टेशन ते वसंतटेकडी दरम्यान कार्यरत ८१३ एम.एम. व १०१६ एम.एम.व्यासाची एम.एस.जलवाहिन्यां विळद घाट येथे स्थलांतरीत करणे बाबत. | रू.३,०५,६८,२६९/- |

तरी वर नमुद विकास कामांचा प्रस्ताव नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत सादर करणे कामी सदर विकास कामांचा तांत्रिक मान्यता प्रदान करून रक्कम रू. ३,०५,६८,२६९/- (तीन कोटी पाच लाख अडूसष्ठ हजार दोनशे एकोणसत्तर फक्त) खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचेकडेस प्रशासकीय मान्यता घेणेकामी सादर करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**Ahilyanagar Municipal Corporation**
**Municipal Secretary Department**
Administrative Building Chhatrapati Sambhajinagar Road,Ahilyanagar

**Hon.Administrator Mahasabha No 34 Decision on Topic**
**Hon.Administrator Resolution No 121** **Date : 12/02/2025**
**Construction Department**

---

**Subject :** Dr.Babasaheb Ambedkar owned by Ahilyanagar Municipal Corporation under Pradhan Mantri Janvikas Program The complete proposal for the construction of 'Constitution Bhawan' in the memorial site to Hon'ble District Magistrate, Ahilyanagar Regarding submission.

**Resolution :-** According to the guidelines given under the Pradhan Mantri Jan Vikas Program in the said letter, detailed proposals have been given to be submitted to the central government through the PMJVK portal online. According to the instructions While submitting the proposal, the revised guidelines of the Pradhan Mantri Jan Vikas Program include the following points.
1. Pradhan Mantri Jan Vikas Program is a centrally sponsored program and the proposals are submitted to the Central Government through the Government of Maharashtra for final approval, so the proposals must be submitted in English language.
2. Minority community population must be more than 25% (15 km radius) at the location of the project submitted for approval and it must be certified as per Annexure ii of the guidelines issued by the Central Government in this regard.
3. The proposed project site must be available government land without encroachment. It is necessary to submit a certificate that the said land is owned by the government and that there is no encroachment on the land and that the land is in possession.
4. The project submitted for approval should not have been approved under any other scheme.
5. According to the provisions of guidelines 2.5.2, 2.5.3 and 2.5.4 of the Prime Minister's Jan Vikas Program, Cost Abstract for projects within Rs.50 lakhs, and PPR (Preliminary Project Report) for projects between Rs.50 lakhs and Rs.10 crores, DPR (Detailed Project Report) is required to be submitted as per the Annexures in the guidelines issued by the Central Government for the next project of Rs.10 crores.
6. Necessary information related to the project in Annexure iii and Annexure iv of the guidelines issued by the Central Government under Pradhanmatri Jan Vikas Program must be submitted along with the proposal.
7. As only one-time funds are given for construction under the Pradhan Mantri Jan Vikas Program, after the completion of the said project, through whom will its maintenance and repair be done and through whom will the said project be operated/ A certificate to be executed must be submitted along with the proposal.
8. Information regarding project completion period or due date must be submitted along with the proposal.
9. Annual recurring and management costs for the project must be provided locally.
10. Proposals like schools, hostels, hospitals must be as per the parameters of the respective department.
11. A socio-economic feasibility report should be prepared clearly indicating the scope of the proposal, including the gap, its Criticality, Objectives, Strategies, Outcomes and Benefits, Milestones and Intended Beneficiaries, Project Duration, Existing and proposed

mechanisms for implementation, management operation and creation Should include maintenance of done/resources.

12. Provisions should be made for barrier-free access for persons with disabilities under the proposed project.

13. Media plan to spread information and create awareness about the project among the target beneficiaries should be submitted along with the proposal.

14. CHECK LIST in Annexure iii of Pradhan Mantri Jan Vikas Program Guidelines along with the proposal Complete information should be submitted with page number.

15. It is necessary to submit the complete budget (Detail Estimate) along with the plan to the government. The above matters A proposal should be submitted after consideration.

The aforesaid instructions have been incorporated in the budget, as well as the above mentioned A.No. 2, 3, 4, 6 are enclosed with the production certificate to be submitted. Annexures are attached to the guidelines.

Also, according to point no.7, after the completion of the said project, it is appropriate to carry out its maintenance and repair through the Municipal Corporation, a certificate to this effect has been attached. Before submitting the proposal, the area where the project is proposed has been checked for its requirements, capacity, similar projects, etc.

Estimates and plans of the said project on Municipal Panel Me.Spanex A.E.C. Solutions, Pune. The said project consultancy firm has given an amount of Rs. 14,90,08,971/- expenditure budget is submitted herewith. The project includes the following items.

1) Multi-functional hall for gathering of 450 people
2) Memorial and Excursion Hall
3) Meditation Hall
4) Library and Reading Gallery
5) Guest canteen and rest rooms
6) Surrounding parking and landscape with compound wall
7) Provision of lift considering multistory
8) Fire protection system

As per the said budget, the plans of the project have been certified by Hon'ble Assistant Director, Urban Planning.

However, regarding the construction of Multi-Sectoral Constitutional Community Hall (Constitutional Bhawan) the sum of Rs. 14,90,08,971/- (literal amount Rs. Fourteen Crore Ninety Lakh Eight Thousand Nine Hundred Seventy One But /-) The Administrator is approving the general meeting to submit teh expenditure proposal to the Hon'ble District Collector,Ahilyanagar

---

**Decisien -** Govermment of Maharashtra,Department of Urban Devlopment,Government Order No MCO-2023/Pro No 413/New 14 Ministry (Main Building) Mumbai -32 dated 28/12/2023 as per authority received under the order Hon.Using the authority of the General Assemely,the above resolution was passed by Hon.Admin approved.

**Meher Lahare**
Q.Municipal Secretary
Ahilyanagar Municipal Corporation

**Yashwant Dange**
Administrator,
Ahilyanagar Municipal Corporation